# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि. २९ एप्रिल, २०२३ दुपारी ०४:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १५५ वी बैठक शनिवार, दि. २९ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी ०४:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरु | अध्यक्षा | उपस्थित |
| २) | डॉ. राजेश दत्तात्रय गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. सिद्राम नारायण सलवदे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १९) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील व डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी) यांनी दुरध्वनीद्वारे/पत्राद्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ दि. १३ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५४ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

कुलसचिव यांनी दि.१३ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | दि. १३ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५४ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.<br>सदर कार्यवृत्तांतामधील पान नं. ३ वरील विषय क्र. १ च्या कार्यवृत्तांतास प्रा. देवानंद चिलवंत यांनी भिन्न (Dissent) मत नोंदविले. तद्नंतर त्यांनी दि.३०/०४/२०२३ रोजीच्या ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे कळविले आहे.<br>"मी प्रा. देवानंद चिलवंत कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य दि.२९/०४/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र. १ च्या ठरावास desent (भिज मत) नोंदविला होता. परंतु माझा डिसेंट ठरावातील संदग्धिता व कंत्राटी पध्दतीने नोकरी देवू करण्याविषयी होता. नियमित पदावरील समायोजनाचा प्रस्ताव पाठविण्यास माझा डिसेंट नाही. तरी आपण श्री. कोरे यांचा नियमित पदावर समायोजनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, त्याबद्दल माझी हरकत नाही." |

विषय क्र.२ **उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथील करणेबाबतचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: आढावा-१५१३/प्र.क्र.१२५ (भाग-८)/म.शि.५, दि.२५ मार्च, २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: उक्त शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यावरील वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० व दिनांक २२/०६/२०२१ च्या शासन निर्णयातील अट शिथील करुन खालील व शर्तीच्या अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे ते खालीलप्रमाणे-

१) प्रथम: अतिरिक्त ठरलेल्या ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची रिक्त पदे तातडीने समायोजित करण्यात यावे. संबंधीत विषयाकरिता ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांचे पद अतिरिक्त नसल्याचे विभागीय सहसंचालकांनी प्रमाणित केल्यानंतरच संबंधीतांना पदभरतीची जाहिरात देता येईल.

२) केंद्राने संवर्गनिहाय आरक्षण धोरण केल्यामुळे, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्थामधील शिक्षकीय पदांचे संवर्गनिहाय आरक्षण धोरण सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१.०४.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्याबाबत विभागाने दिनांक ०८.०४.२०२२ रोजीची अधिसूचना निर्गमित केली आहे. त्यानुसार आरक्षण धोरणाची नेमकी कार्यपध्दती कशी असावी, याबाबत विभागाच्या दिनांक ११.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उपरोक्त पदांना आरक्षण लागू राहील.

३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २४.०६.२०२२ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नवीन आरक्षण धोरण लागू होण्यापूर्वी ज्या महाविद्यालयांनी जाहिरात प्रसिध्द केलेली आहे, त्या महाविद्यालयांना नवीन आरक्षण लागू होणार नाही. त्यामुळे यापूर्वी मान्यता मिळून जाहिरात प्रसिध्द झालेल्या पदांची भरतीप्रक्रिया स्थगित / प्रलंबित असल्यास त्याकरिता मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा.

४) विभागाच्या आकृतीबंधात मंजूर असतील तेवढ्याच पदांवर पदभरती केली जावी. त्याव्यतिरिक्त पदांवरील पदभरती केल्यास अशा उमेदवारांच्या वेतनाची जबाबदारी ही संबंधीत संस्थेची असेल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

५) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याच्या अनुषंघाने उच्चस्तरीय सचिव समितीने काही बाबींची पूर्तता करण्याचे निर्देश दिलेले असल्याने, अद्याप आकृतिबंध निश्चित झालेला नाही. त्यामुळे पदभरतीवरील निर्बंध शिथील करुन उपरोक्त प्रमाणे पद भरतीस मान्यता देताना दिनांक ०१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे ही आधारभूत मानून अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत. तथापि, आकृतिबंध अंतिम झालेला नसल्याने, आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत सदरची पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत.

६) उपरोक्त पदांचा सुधारित आकृतीबंध तयार करुन त्यास मान्यता घेण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी विनाविलंब करावी.

७) अकृषि विद्यापीठ संलग्नित सशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अनुज्ञेय पदभरती करताना विद्यापीठ अधिनियमातील विहीत तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच विहीत प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात यावेत.

तरी वरीलप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: आढावा-१५१३/प्र.क्र.१२५ (भाग-८)/म.शि.५, दि.२५ मार्च,२०२३. नुसार कार्यवाही करण्याबाबत उक्त पत्रान्वये कळविले आहे.

दि.२७/०३/२०२३ रोजीच्या मान्य टिपणीन्वये मा.कुलगुरु महोदय यांनी नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरुमहोदय यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे.

उपरोक्त शासन निर्णय विद्यापीठ जावक क्र.पुअहोसोविसो/विशेष कक्ष/२०२३/२१२७, दि. ३१ मार्च,२०२३ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये कळविण्यात आले आहे.

सबब, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यावरील निर्बध शिथील करणेबाबतचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: आढावा-१५१३/प्र.क्र.१२५ (भाग-८)/म.शि.५, दि.२५ मार्च,२०२३ रोजीचे शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरुमहोदय यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.३ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रस्तावित नवीन महाविद्यालय सुरु करणेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर खादी ग्रामोद्योग संघ, मंगळवेढा या संस्थेकडून प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ व उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१५/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार प्रस्तावीत नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर खादी ग्रामोद्योग संघ, मंगळवेढा संस्थेकडून अंतिम मान्यता इरादापत्र करिताचे प्रस्ताव प्राप्त झाले आहे. सदरील प्रस्तावांवर विहित कार्यवाही करुन दि. ०१ मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी शासनाकडे सादर करावयाचे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३- २४ साठी प्रस्तावित नवीन एका महाविद्यालयांसाठी अंतिम मान्यता इरादापत्र करिता प्रस्ताव प्राप्त झालेले असून त्याची दिनांक १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार छाननी समितीची व तज्ज्ञ समितीची (Spot Visit) कार्यवाही पुर्ण झालेली आहे. तद्नंतर अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करावयाची कार्यवाही व सदरच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, दि. १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (३) (च) मधील तरतूदीनुसार १ मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी शासनास सादर करावेत असे आदेशित केलेले आहे. अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यासाठी व सदरीच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. यास्तव वेळेअभावी तातडीची बाब असल्याने अधिष्ठाता मंडळाच्या व व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात एक प्रस्ताव शासनास सादर करण्यास दि.२०/०४/२०२३ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे

सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रस्तावित नवीन महाविद्यालय सुरु करणेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर खादी ग्रामोद्योग संघ, मंगळवेढा या संस्थेकडून प्राप्त प्रस्तावांवर दिनांक १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र.४ **श्री. सुर्यवंशी शशिकांत विजय, तारतंत्री, श्री. व्हनमाने पंकेश अप्पाशा, नळकारागीर व श्री. पठाण जाकिर रशिद, सुतार यांचे दि.२०/०८/२०२२ व २८/०३/२०२३ रोजीचे विनंती अर्ज विचारार्थ.**

टिपणी: उपरोक्त अर्जान्वये सदर कर्मचाऱ्यांना विद्यापीठामार्फत दरवर्षी ऑगस्ट महिन्यात वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांप्रमाणे गणवेश दिला जात असल्याने तसेच वर्ग-४ कर्मचाऱ्यांना गणवेश धुलाईकरिता दरमहा रु.५०/- इतका धुलाई भत्ता वेतनासोबत मिळत असल्याने त्यांनाही वर्ग-४ कर्मचाऱ्यांप्रमाणे दरमहा वेतनासोबत गणवेश धुलाई भत्ता मिळण्याबाबत उपरोक्त अर्जान्वये विनंती केली आहे.

प्रस्तुत विद्यापीठातील खालील नमूद पदावरील कर्मचाऱ्यांना गणवेश दिला जात असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे पदनाम | गणवेशाचा रंग |
|---|---|---|
| १) | सुतार, नळकारागीर, तारतंत्री, झेरॉक्स ऑपरेटर, शिपाई, स्वच्छक | पुरुष-खाकी,<br>महिला-पिवळी साडी |
| २) | प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर | पांढरा रंगाचा ॲपरॉन |
| ३) | वाहन चालक, जमादार, हवालदार | पांढरा |
| ४) | चौकीदार | खाकी |

उपरोक्त पैकी झेरॉक्स ऑपरेटर, शिपाई, स्वच्छक, प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर, वाहनचालक, जमादार, हवालदार व चौकीदार ही पदे वर्ग-४ मध्ये मोडतात. तर सुतार, नळकारागीर व तारतंत्री ही पदे वर्ग-३ मध्ये मोडतात.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकीर्ण २००८/प्र.क्र.८८३/आस्था-२, दि.३१/०५/२००८ व सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६/०३/२००८ च्या शासन निर्णयानुसार सुधारित रु.५०/- इतका वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांसाठी धुलाई भत्ता अदा करण्याबाबत शासन निर्णय पारित करण्यात आला आहे. तथापि, वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी धुलाई भत्ता देण्याबाबतची तरतुद शासन निर्णयात नमूद नाही.

तसेच श्री. सुर्यवंशी शशिकांत विजय, तारतंत्री, श्री. व्हनमाने पंकेश अप्पाशा, नळकारागीर व श्री. पठाण जाकिर रशिद, सुतार यांच्या दि.०१/०१/२०१३ रोजीच्या अर्जास अनुसरुन प्रस्तुत विभागाने दि.०५/०१/२०१३ रोजी टिपणी सादर केली असता दि.२३/०३/२००८ च्या शासन निर्णयानुसार वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांनाच धुलाई भत्ता देय होतो. वर्ग-३ मधील कर्मचाऱ्यांना देय होत नसल्याने त्यांची विनंती अमान्य करण्यात आली.

सबब, श्री. सुर्यवंशी शशिकांत विजय, तारतंत्री, श्री. व्हनमाने पंकेश अप्पाशा, नळकारागीर व श्री. पठाण जाकिर रशिद, सुतार यांचे दि.२०/०८/२०२२ व २८/०३/२०२३ रोजीचे विनंती अर्ज विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **श्री. सुर्यवंशी शशिकांत विजय, तारतंत्री, श्री. व्हनमाने पंकेश अप्पाशा, नळकारागीर व श्री. पठाण जाकिर रशिद, सुतार यांची पदे वर्ग-३ मध्ये असल्याने संबंधितांना गणवेश घालणे बंधनकारक नाही. यास्तव, यापुढे त्यांना गणवेश सक्तीचा करु नये व त्यामुळे त्यांना धुलाई भत्ता देण्याची आवश्यकता नाही असे सर्वानुमते ठरले.** |

**विषय क्र.५ उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना दिल्या जाणाऱ्या सोयी व सुविधा बाबत माहिती देण्यासाठी दिव्यांग सहायक तथा संगणक लेखनिक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या श्री नानक लटके यांची वेतन वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: TATA Institute of Social Science या संस्थेसोबत प्रस्तूत विद्यापीठाने MoU केला असून उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना दिल्या जाणाऱ्या सोयी व सुविधाबाबत माहिती देण्यासाठी अथवा प्रत्यक्ष मदत करणे इत्यादीसाठी फेलोची नियुक्ती करण्यास व त्यास रु.३५,०००/- इतके वेतन आदा करावे असे नमुद केले आहे. त्यास अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठात एका फेलोची नियुक्ती करण्याबाबत TATA Institute of Social Science या संस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली कोल्हे यांनी कुलसचिव यांना भ्रमणध्वनीवर एसएमएसव्दारे कळविले होते.

सदरबाबत कुलसचिव तसेच संचालक, विद्यार्थी विकास विभाग व मा. कुलगुरु महोदया यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागात कार्यरत असलेले श्री. नानक लटके, संगणक लेखनिक स्वत: दिव्यांग असून त्यांना दिव्यांगाच्या सर्व कामाचा असणारा अनुभव विचारात घेवून दिव्यांग फेलो / सहायक म्हणून दरमहा रुपये १५,०००/- एकत्रित वेतनावर दि.०१/०९/२०२१ पासून नियुक्ती करण्यास मा कुलगुरु महोदया यांनी मान्यता दिली होती. त्याच बरोबर विद्यार्थी विकास विभागातील कंत्राटी संगणक लेखनिक पदाचे अधिकचे कामही त्याना देण्यात आले होते. श्री. नानक लटके यांची संगणक लेखनिक तथा दिव्यांग सहायक म्हणून नियुक्ती केल्याने त्यांच्या वेतनाचा भार हा दिव्यांगाकरीता करण्यात येणाऱ्या तरतुदीमधून भागविण्यात येवून विद्यार्थी विकास विभागातील काम करणाऱ्या एका कंत्राटी लेखनिकाच्या वेतनापोटीचा खर्च कमी झाला आहे. तसेच शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना दिल्या जाणाऱ्या सोयी व सुविधाबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्याचे काम व दिव्यांगाना मदतही होत आहे.

श्री. नानक लटके, संगणक लेखनिक व दिव्यांग सहायक असे दोन्ही पदभार सांभाळून विद्यार्थी विकास विभागाचे कामकाज अतिशय कार्यक्षमपणे पार पाडत आहेत. ते विद्यापीठातील विविध कार्यक्रमात आवश्यकतेनूसार फोटोग्राफीचे काम करतात. तसेच युवा महोत्सवात संगीत संयोजन, वाद्यसाहित्य दुरुस्ती तसेच राज्यात तसेच परराज्यात संघासोबत हजर राहून संघव्यवस्थापकांना मदतनिस म्हणून देखील काम पाहतात. तरी या सर्व बाबींचा तसेच त्यांचा मागील १४ वर्षाचा अनुभव व वाढती महागाई, दोन्ही मुलींचे उच्च शिक्षणाचा खर्च विचारात घेता दिव्यांग फेलो / सहायक व संगणक लेखनिक या कामासाठी मिळणाऱ्या त्यांच्या चालू वेतनात रु. १०,०००/- इतकी वाढ करण्याबाबतचा विनंती अर्ज विद्यार्थी विकास विभागाकडे सादर केला आहे. सबब करारानुसार दिव्यांग फेलो / सहायकसाठी वेतनस्वरुपात करण्यात आलेल्या प्रति माह रु. २५,०००/- इतकी तरतुद विचारात घेता, त्यांच्या चालू वेतनात वेतनात वाढ करण्याची बाब विचारार्थ.

| ठराव: | **उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना दिल्या जाणाऱ्या सोयी व सुविधा बाबत माहिती देण्यासाठी दिव्यांग सहायक तथा संगणक लेखनिक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या श्री. नानक लटके यांना प्रति माह रु.२५,०००/- इतके एकत्रित वेतन अदा करण्यास व सदरची वाढ ही माहे मे, २०२३ पासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.६ मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० च्या बैठकीतील विषय क्रमांक ०५ मधील विद्यापीठाच्या वाहन व वाहनचालक वापराबाबतच्या नियमावली ठरावामध्ये सुधारणा करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: विद्यापीठाकडील अतिथिगृह उपलब्ध करुन देतेवेळी संबंधीत व्यक्तींकडून फॉर्म भरुन घेण्यासाठीचा नमुना तयार करणे, अतिथिगृहासाठी नवीन नियमावली तयार करणे, विद्यापीठ वाहनांसाठी नियमावली तयार करणे व गेटपास इ. संदर्भात सर्वकष नियमावली तयार करण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषेदच्या दिनांक ११ मार्च, २०१९ च्या बैठकीतील ठराव क्रमांक ८(१३) अन्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ.एच.के. अवताडे | अध्यक्ष |
| २. | ॲड श्रीमती एन. एस. मंकणी | सदस्या |
| ३. | श्री. ए.के. आवळे | सदस्य |

उपरोक्तप्रमाणे विद्यापीठाकडील अतिथीगृह व वाहन वापरा संदर्भात सर्वकष नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा विद्यापीठाकडील वाहन व वाहनचालक वापराबाबतचा अहवाल मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० च्या बैठकीत विचारार्थ ठेवला असता यामध्ये विषय क्रमांक (०५) अन्वये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.

ठराव: विद्यापीठाकडील वाहन व वाहनचालक वापरासंदर्भात सर्वकष नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल स्वीकारुन खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- विद्यापीठ वाहन व वाहनचालक ची नियमावली क्र. २५ मधील दुरुस्ती: विद्यापीठाकडील उपलब्ध वाहनानुसार मा.कुलगुरु मा.प्र-कुलगुरु व मा.कुलसचिव यांना कार्यालयीन कामासाठी सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार (Table -II) कायम स्वरुपासाठी वाहने उपलब्ध असतील.
- विद्यापीठ वाहन वापर व वाहनचालक ची नियमावली क्र. २६ मधील दुरुस्ती: मा.कुलगुरु महोदय यांच्या वाहनाशिवाय इतर सर्व वाहने विद्यापीठातील वर्ग १ व वर्ग २ चे अधिकारी किंवा अभ्यागंतासाठी तात्पुरत्या स्वरुपात वाहन चालकासहीत पाठविण्याचा अधिकार मा.कुलसचिव यांना असेल.

- वाहनचालकांसाठी नियमावली क्र. ४ व १२ वगळण्यात यावी असे ठरले.
- वाहनचालकांसाठी नियमावली क्र. १५ मधील दुरुस्ती: मा.कुलगुरु महोदय यांचे वाहनचालक वगळता इतर सर्व वाहनचालकांना साखळी पध्दतीने सोलापूर शहराबाहेर विद्यापीठाच्या कामासाठी वाहने घेवून जाणे बंधनकारक असेल.
- विद्यापीठाकडील वाहनवापर व वाहनचालकांसाठी करण्यात आलेल्या नियमावलीमध्ये " विद्यापीठ अभियंता / अभियांत्रिकी विभाग " या शब्दाऐवजी " मा.कुलसचिव " हा शब्द वापरण्यात यावा.

तथापि, उपरोक्त ठरावातील मुद्दा क्रमांक ०१ व ५ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

१. सोबत जोडलेल्या महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण -२०२१ / प्र.क्र.१५८/२१/विशी - १, दि. ०८ सप्टेबर, २०२१ या शासन निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठाचे मा.कुलगुरु, मा. प्र.कुलगुरु, कुलसचिव/ संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी यांना विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी विद्यापीठाची वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. त्यामुळे उपरोक्त ठरावामध्येही याप्रमाणे दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे.

२. (ठरावातील मुद्दा क्रमांक ५) विद्यापीठाकडील वाहन व वाहनचालक उपलब्धतेबाबत अभियांत्रिकी विभागास पुर्णत: माहिती असते, त्यामुळे विद्यापीठाकडील वाहन वापर व वाहन चालकांसाठी करण्यात आलेल्या नियमावलीमध्ये "मा.कुलसचिव" या शब्दाऐवजी " विद्यापीठ अभियंता / अभियांत्रिकी विभाग " असा शब्द वापरण्यात यावा याप्रमाणे दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे.

तरी, वरीलप्रमाणे मुद्दा क्रमांक ०१ व २ प्रमाणे मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि.२६ फेब्रुवारी, २०२० च्या बैठकीतील विषय क्रमांक ०५ मधील विद्यापीठाच्या वाहन व वाहनचालक वापराबाबतच्या नियमावली ठरावामध्ये सुधारणा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| ठराव: | **व्यवस्थापन परिषदेच्या दि. २६ फेब्रुवारी, २०२० च्या बैठकीतील विषय क्रमांक ०५ मधील विद्यापीठाच्या वाहन व वाहनचालक वापराबाबतच्या नियमावली ठरावामध्ये सुधारणा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली, जसे की शासनाच्या निर्णयानुसार मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी व संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या सांविधिक अधिकारी यांना वाहन देणे व अभियांत्रिकी विभागाने वाहन वापरण्याचे नियोजन करावे असे सर्वानुमते ठरले.** |
|---|---|

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

**विषय क्र. ७ (१)** **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखेत अशंत: बदल करण्याची बाब अधिष्ठाता मंडळास सादर केली असता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस तातडीची बाब असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनूसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने स्विकारुन पुढील आवश्यक ती कार्यवाहीस्तव मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (१) मधील तरतुदीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन सर्व संलग्नित महाविद्यालयास दि.२३/११/२०२२ रोजीच्या सुधारित परिपत्रकान्वये कळविण्यात आलेल्या आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा संदर्भात मा.कुलगुरु महोदय, मा. प्र-कुलगुरु व कुलसचिव यांच्यामध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने पारंपारिक, विधी व शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या सत्र समाप्तीच्या तारखा ३०/०४/२०२३ ऐवजी ३१/०५/२०२३ असा अंशत: बदल करण्यासंदर्भात अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विषय सादर करण्यासाठी दि.२६/०४/२०२३ रोजीच्या कार्यालयीन टिपणीअन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदरील बाब दि.२७/०४/२०२३ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीसमोर सादर केली असता त्यामध्ये वरील प्रामणे बदल करुन अधिष्ठाता मंडळाने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

तथापि, चालू शैक्षणिक वर्षाच्या पारंपारिक अभ्यासक्रमाची सत्र समाप्ती दि.३०/०४/२०२३ रोजी असून त्यादिवशी रविवार असल्याने सार्वजनिक सुट्टी आहे. यास्तव शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ साठीच्या सत्र समाप्तीच्या तारखेत अंशत: बदल झाल्याने सुधारित परिपत्रक तातडीने निर्गमित करणे आवश्यक असल्याने त्यासंदर्भात दि.२८/०४/२०२३ रोजी कार्यालयीन टिपणी सादर केली असता मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभा या प्राधिकरणाच्या वतीने मान्यता दिलेली आहे. त्याअनुरोधाने सर्व संलग्नित महाविद्यालयास सत्र समाप्तीच्या तारखेत अंशत: बदल झाल्याचे दि.२८/०४/२०२३ रोजीच्या सुधारित परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखेत अशंत: बदल करण्याची बाब अधिष्ठाता मंडळास सादर केली असता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस तातडीची बाब असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनूसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने स्विकारुन पुढील आवश्यक ती कार्यवाहीस्तव मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र. ७ (२) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व सर्व संलग्नित महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस तातडीची बाब असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनूसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने स्विकारुन पुढील आवश्यक ती कार्यवाहीस्तव मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (१) (य) मधील तरतुदीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दरवर्षीप्रमाणे निश्चित करणे असल्याने सदरील बाब अधिष्ठाता मंडळाच्या विचारार्थ सादर केली असता त्यावर अधिष्ठाता मंडळाने दि.२७/०४/२०२३ रोजीच्या बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| १) | कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे, (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुले) एम. एस. डब्ल्यु. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये) | २० जून, २०२३ | १० नोव्हेंबर, २०२३ | ०४ डिसेंबर, २०२३ | ३० एप्रिल, २०२४ |
| २) | विधी व शिक्षणशास्त्र (बी. एड, बी. पी. एड, एम. एड, एम. पी. एड, एम. ए. एज्युकेशन इत्यादी (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये) | २० जून, २०२३ | १० नोव्हेंबर, २०२३ | ०४ डिसेंबर, २०२३ | ३० एप्रिल, २०२४ |
| ३) | अभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम एम. बी. ए. इत्यादी (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील संकुले) | १५ जुलै, २०२३ | ३० नोव्हेंबर, २०२३ | ०१ जानेवारी, २०२४ | १५ मे, २०२४ |

अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ करिताचे सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांस व्यवस्थापन परिषद व त्यानंतर विद्यापरिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु दि.२९/०४/२०२३ रोजी व्यवस्थापन परिषदेची बैठक ठिक दुपारी ०४:०० वा. तर विद्यापरिषदेची बैठक ठिक दुपारी ०३:०० वा. आयोजित केली असल्याने, सदर प्रकरणी व्यवस्थापन परिषदेची शिफारस विद्या परिषदेस पुढील कार्यवाहीस्तव सादर करणे आवश्यक आहे. सदरील तातडीची बाब असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दि.२८/०४/२०२३ रोजीच्या टिपणी अन्वये मान्यता दिली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व सर्व संलग्नित महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस तातडीची बाब असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनूसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने स्विकारुन पुढील आवश्यक ती कार्यवाहीस्तव मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| विषय क्र. ७ (३) | **सौ. वैदेही विलास कुलकर्णी यांनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या १ ऑगस्ट या विद्यापीठ वर्धापन दिनी "कै. आशाताई वसंतराव देशमुख (मार्डीकर) स्मृती पुरस्कार" प्रदान करण्यासाठी एक लाख रुपयांचा धनादेश विद्यापीठास दिला आहे. अभ्यासमंडळे विभागाच्या दि.२३/०३/२०२३ रोजीच्या मान्य टिपणी नुसार धनादेश स्वीकारण्यास, मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यास व स्वतंत्र बजेटहेड तयार करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही महितीस्तव.** |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या १ आगस्ट या विद्यापीठ वर्धापन दिनी, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील व विद्यापीठ परिसर संकुलातील विद्यार्थ्यांसाठी विविध पुरस्कार प्रदान केले जातात. त्यानुसार सौ. वैदेही विलास कुलकर्णी यांच्या दि.२१/०३/२०२३ रोजीच्या विद्यापीठास प्राप्त पत्रानुसार "कै. आशाताई वसंतराव देशमुख (मार्डीकर) स्मृती पुरस्कार" या नावाने B. Pharmacy या अभ्यासक्रमात प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या गरजु विद्यार्थीनीस पुरस्कार स्वरुपात शिक्षनास मदत होण्यासाठी सौ. वैदेही विलास कुलकर्णी यांच्या कडून विद्यापीठास एक लाख रुपयांचा धनादेश चेक क्र.०३१३२३ देण्यात आला आहे. त्या रकमेच्या व्याजापोटी येणारी रक्कम विद्यार्थीनीस पुढील शिक्षणासाठी या पुरस्कार रुपाने देण्यात यावे असे कळविले आहे. अभ्यासमंडळे विभागाच्या दि.२३/०३/२०२३ रोजीच्या मा.कुलगुरु महोदयांच्या मान्य टिपणी नुसार एक लाख रुपयांचा धनादेश स्वीकारण्यास, सदरचा धनादेश मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यास तथा "कै. आशाताई वसंतराव देशमुख (मार्डीकर) स्मृती पुरस्कार" या नावे चालू वर्षामध्ये स्वतंत्र बजेट हेड तयार करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे.

सबब, सौ. वैदेही विलास कुलकर्णी यांनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या १ ऑगस्ट या विद्यापीठ वर्धापन दिनी "कै. आशाताई वसंतराव देशमुख (मार्डीकर) स्मृती पुरस्कार" प्रदान करण्यासाठी एक लाख रुपयांचा धनादेश विद्यापीठास दिला आहे. अभ्यासमंडळे विभागाच्या दि.२३/०३/२०२३ व ५/०४/२०२३ रोजीच्या मान्य टिपणी नुसार धनादेश स्वीकारण्यास, मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यास व स्वतंत्र बजेटहेड तयार करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही महितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र. ७ (४) सर्व संकुलातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे प्रवेश, परीक्षा व इतर शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यासाठी IndusInd बँकेची Gateway प्रणाली सुविधा घेण्यास व त्यासाठी कागदपत्र देणे, करार करण्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळणेबाबत.

टिपणी: विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व मा.कुलपती कार्यालय, मुंबई यांनी विद्यापीठ परिसरातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत वेळोवेळी सुचना दिलेले आहेत. त्याअनुषंगाने सर्व संकुलातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची प्रवेश, परीक्षा व इतर फी ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यासाठी यापुर्वी Axis Bank व HDFC Bank यांना पर्यायी व्यवस्था म्हणुन IndusInd बँकेचे नवीन खाते उघडण्यास व Gateway प्रणाली घेण्यास मा. कुलगुरु महोदया यांनी दि.०४/०८/२०२२ रोजीच्या टिपणी अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने IndusInd बँकेत ०१ Zero Balance बचत खाते उघडण्यात आले आहे. सदरची Gateway प्रणाली घेण्याकरिता बँकेसोबत करार करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावामध्ये IndusInd बँकेने सर्व सुविधा निशुल्क पद्धतीने देण्याबाबत दि.२९/१०/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

सबब, IndusInd बँकेमार्फत सर्व संकुलातील व इतर विद्यार्थ्यांना तसेच भविष्यात महाविद्यालयाचे विविध शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी खालील निशुल्क पद्धतीने सुविधा घेण्यास मान्यता असावी.

| Sr. No. | Facilities | Charges for University |
|---|---|---|
| 1 | Payment Gateway installation and annual rent | Nil |
| 2 | PoS Machine Annual Rental Charges | Nil |
| 3 | Enet Solution Installation and Renewal | Nil |
| 4 | Credit Cards (Master/ Visa/ Rupay/ Maestro) | Nil |
| 5 | Transaction below Rs. 2,000/- | Nil |
| 6 | Transaction Above Rs. 2,000/- | Nil |
| 7 | Rupay Card | Nil |
| 8 | UPI | Nil |

उपरोक्त सुविधा उपलब्ध होण्यासाठी बँकेकडुन वेळोवेळी मागणी करण्यात आलेले आवश्यक कागदपत्रे (सुविधा घेण्याचा Form/ KYC documents, विद्यापीठ नोंदणी प्रमाणपत्र, पत्याचा पुरावा, पॅन कार्ड इ.) बँकेस देण्यास तसेच करार करण्यास ही मान्यता असावी.

| ठराव: | सर्व संकुलातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे प्रवेश, परीक्षा व इतर शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यासाठी IndusInd बँकेची Gateway प्रणाली सुविधा ही विद्यार्थी व विद्यापीठ यांना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही या अटीवर घेण्यास व त्यासाठी कागदपत्र देणे, करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
|---|---|

प्रा. डॉ. गौतम कांबळे यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| | |
|---|---|
| विषय क्र. ७(५) | ज्ञानस्रोत केंद्रातील श्री. येले के. बी., कंत्राटी संगणक तज्ज्ञ यांच्या एकत्रित वेतनात वाढ करण्याची बाब विचारार्थ. |

| | |
|---|---|
| ठराव: | ज्ञानस्रोत केंद्रामध्ये कंत्राटी संगणक तज्ज्ञ म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या श्री. येले के. बी. यांना प्रति माह रु.२०,०००/- इतके वेतन अदा करण्यास व सदरची वाढ ही माहे मे, २०२३ पासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

मा.कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद